ील

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : ७८/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री. प्रकाश विठ्ठलराव खापने,**

--विरुध्द--

**जन माहिती अधिकारी, तथा सचिव,**
**ग्रामपंचायत, दहेगांव, ता. वरोरा, जि. चंद्रपूर**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १०.०१.२०२४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| २५.११.२०२१ | --- | १८.०५.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. २९१४/२०१९ मध्ये दिनांक २५.११.२०२१ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १०.०१.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, दहेगांव, ता. वरोरा जि. चंद्रपूर श्री. एकनाथ नत्थुजी चाफले उपस्थित असून तत्कालिन जनमाहिती अधिकारी श्री. टि. एम. लांजेवार उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. २९१४/२०१९ मध्ये दिनांक २५.११.२०२१ रोजी सुनावणी घेवून " गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वरोरा ता. जि. चंद्रपूर यांनी प्रशासकीय स्तरावर गंभीर दखल घेवून चौकशी करणे अपेक्षित आहे. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत अर्जदार श्री. प्रकाश खापने यांना मागितलेल्या माहितीचा पुरवठा

विनामूल्य करावा व त्यासंदर्भातील अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा." असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक ११.०५.२०२२ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. द्वितीय अपील क्र. २९१४/२०१९ मध्ये दिनांक २५.११.२०२१ रोजी पारित आदेशाचे अनुपालन झाले नसल्यामुळे तसेच गटविकास अधिकारी, पंचायत समिती वरोरा यांनी चौकशी लावली नाही. आणि माहिती दिली नसल्यामुळे तक्रार दाखल केली. गट विकास अधिकारी यांनी दि. ०९.०१.२०२४ रोजी सादर केलेल्या पत्राचे अवलोकन केले असता, पारित आदेशानुसार चौकशी अहवाल आयोगास सादर केला आहे. अपिलार्थी यांना दि. ११.०५.२०२२ रोजी प्रत्यक्षात कार्यालयात बोलावून माहिती दिली असता, त्यांनी माहिती स्विकारली नाही. त्यानंतर त्यांना दि. १८.०५.२०२२ रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविली. परंतु सदर माहितीचा बंद लिफापा पोस्टाने शेरासह ग्रामपंचायत कार्यालयात परत आला आहे. श्री. विशाल नानाजी पारखी यांच्या बयानाची सादर चौकशी अहवालाची प्रत देण्यात आली आहे. पंचायत समिती, वरोरा यांनी अपिलार्थी यांना कलम २ च प्रमाणे माहिती प्रदान केली. तसेच या प्रकरणात श्री. विशाल पारखी यांनी त्यांच्या घराच्या बांधकाम परवानगीसाठी अर्ज केलेला असल्याचे दिसून येते. परंतु बांधकास ग्रामपंचायतीने परवानगी दिली अथवा नाकारली याबाबत कळविले नाही. याबाबत ग्रामपंचायत मासिक सभेत सुद्धा सदर अर्ज ठेवण्यात आलेला नाही. ग्रामपंचायत महाराष्ट्र अधिनियम १९५९ चे कलम ५२ (२-अ) अनुसार ६० दिवसाच्या आत बांधकामाबाबत परवानगी देणे अथवा नकार कळविला नाही. त्यामुळे उक्त साठ दिवसाच्या कालावधीच्या समाप्तीनंतरच्या लगेच्या पुढच्या दिवशी अशी परवानगी देण्यात आली असल्याचे समजण्यात येते. अशाप्रकारे गट विकास अधिकारी यांनी या कायदेशीर प्रक्रियेचा दाखला दिला आहे. त्यानुसार अपिलार्थी यांना माहिती प्रदान करण्याचे नमूद केले आहे. आयोगाने पारित केलेल्या आदेशाचे याआधीच अनुपालन झाले असल्याची बाब लक्षात घेता प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे. सदर प्रकरणी अपिलार्थी यांना व्यक्तिश: माहिती पोस्टाने पाठविली असून त्यांनी ती घेतली नसल्याने त्यांना सदर माहितीबाबत स्वारस्य नसल्याचा काढलेला निष्कर्ष प्रथमदर्शनी योग्य असल्याचे आढळून येते. सबब, प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक :** १०.०१.२०२४

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★

**जा.क्र.** 2074 **दि.** 4 APR 2024